# विश्व आदिवासी दिवस जिंदाबाद

## आदिवासींच्या अधिकार, आत्मसम्मानाचा दशाब्दी समारोह मोठ्या उत्साहाने साजरा करू!

### भूमिका

9 आगस्ट हा विष्ठव मूलनिवासींचा आंतरराष्ट्रीय दिवस. मूलनिवासी जनतेच्या हक्काचे सरंक्षण व प्रगती बरोबरच जगातील मानव जातीचे पर्यावरण संरंक्षणासाठी मूलनिवासी जनतेने केलेले योगदान आणि त्यांनी केलेली कामगिरी समजून घेण्यासाठी जगातील सर्व मूलनिवासी हा दिवस साजरा करीत आसतात. संयुक्त राष्ट्र संघ द्वारा डिसेंबर 1994 रोजी मूलनिवासींचा आंतरराष्ट्रीय दिवस घोषित करण्यात आला. संयुक्त राष्ट्र संघाने 1982 मध्ये नियमित मानवाधिकारांचा विकास व संरक्षण आयोगाने कार्यकारी समूहांचा (वर्किंग ग्रुप) बनवण्यात आला. ज्यात मूलनिवासी जनतेचा एक कार्यकारी समूह आहे. या समूहाची जी पहली बैठक झाली त्याचं दिवसाला आंतरराष्ट्रीय मूलनिवासी दिवस म्हणुन संयुक्त राष्ट्र संघाने घोषित केला. मूलनिवासींचे मूलभूत स्वतंत्र आणि त्यांच्या अधिकारांचा विकास तथा संरक्षणातुन होणारा विकास आणि अधिकारांबाबत आंतरराष्ट्रीय निकषाच्या अनुरूप बदल घडुन आणण्यासाठीच मूलनिवासी कार्यकारणी समूह बनविण्यात आला होता. ह्या समूहानेच संयुक्त राष्ट्र संघाच्या बैठकीतुन पारित केलेला प्रस्ताव 49/214 च्या अनुसार 23 डिसेंबर 1994 ते 2004 पर्यंत प्रत्येक वर्षी 9 ऑगस्ट हा दिवस मूलनिवासींचा आंतरराष्ट्रीय दिवस साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. पुढे हा समयावधी दर दहा वर्षासाठी म्हणजे 2005 ते 2015 पर्यंत वाढविण्यात आला. म्हणजे मूलनिवासींचा आंतरराष्ट्रीय दिवस साजरा करण्याचे हे ष्ठोवटचे वर्ष आहे. पुढे सप्टेंबर 2008 पर्यंत मूलनिवासींच्या कार्यकारणी समूह ऐवजी मूलनिवासीयांच्या अधिकाराची तज्ञ यंत्रना (EMRIP) अस्थित्वात आलं.

वरील सर्व संदर्भ लक्षात घेता विष्ठव मूलनिवासी दिवस या आंतरराष्ट्रीय दष्ठाकाच्या ष्ठोवटच्या वर्षात आदिवासी जनतेच्या हक्क आणि आत्मसम्मानासाठी दृढ निष्ठचयाने संघर्ष करण्याच्या उद्देष्ठाने आपल्या गावात मोठ्या धुमधडाक्याने या दिवसाला साजरा करूया. आजमितीला सर्व देष्ठातील आदिवासी जनतेपुढे अनेक आव्हाने असतांना आपल्या अधिकार आणि आत्मसम्मानसाठी आपण सर्व एक होऊन त्यासाठीचा संघर्ष करू अष्ठी या दिनाच्या औचित्याने ष्ठापथ घेऊ. याप्रसंगी भारत देष्ठातील दोन ष्ठातकांचे कालखंड बघितल्यास म्हणजे 1947 च्या पूर्वी आणि नंतर विदेष्ठी आणि देष्ठी ष्ठासकां विरोधात संघर्षात आपले प्राण अर्पण करणारे समस्त जनयोद्धे संथाल, कोल, हो, उरांव, कोंदु, कोया, खासी, मुंडा, भील, कोली, कोंडारेड्डी, चेंचु, ताडो, कुकी या सर्वच जनयोद्धांचे प्रत्यक्ष नाव घेऊन त्यांना जोहार अर्पित करू. गेंदसिंग, वीर बाबूराव सडमेक, गुंडाधुर, कोमराव भीम, प्रवीरचंद्र भंजदेव सहित आपल्या गडचिरोली जिल्हातील आदिवासी जनतेच्या हिता करीता आपले प्राण अर्पण करणाऱ्यांचे स्मरण करून त्यांना जोहार अर्पण करू.

आपल्या देष्ठातील स्वातंत्र संग्रामाच्या इतिहासात 9 ऑगस्टला महान महत्व आहे. ह्याच दिवष्ठी महात्मा गांधींच्या आव्हानावर 'क्विक इंडिया' (भारत छोडो) आंदोलनाची सुरूवात झाली होती. देष्ठाच्या स्वातंत्र्यासाठी जनता आंदोलनात सामील होऊन ब्रिटिष्ठ साम्राज्यवादी ष्ठासकांच्या बंदूकीच्या गोळ्या, तोफा, फाष्ठी, अटकसत्र आणि छळणूक यांची तमा न बाळगता अत्यंत साहसाने लढले. ह्या जन उद्रेकाला बघुन गांधीने 1944 मध्ये आंदोलन मागे घेतले. परंतु; तेव्हा पर्यंत चार हजार भारतीयांनी आपला जीव गमाविला होता. साठ हजार लोकांना अटक करण्यात आले होते. अष्ठया या सर्व योद्धांना ज्यांनी देष्ठाच्या स्वातंत्र्यासाठी आपले प्राण अर्पण केले त्या सर्वांना श्रद्धांजली अर्पण करू आणि त्यांच्या बलिदानातुन स्फुर्ति घेऊन आपला संघर्ष पूढेही चालू ठेवण्याचा संपल्प धरू.

### मूलनिवासियांच्या पूढे असलेली आव्हाने:

## 1. आदिवासी-धर्म-धर्मांतरण

हे आव्हान प्रत्यक्षात आदिवासियांच्या अस्थित्वाष्ठी जुळलेले आहे. हिंदू आक्रमणकारी द्वारा देष्ठातील सर्व रहिवासीयांना हिंदू मानण्याचा प्रभाव वाढत आहे. ज्यात ते देष्ठातील समस्त मूलनिवासीयांना आपल्यात विलय करण्याचा प्रयास करीत आहेत. आपल्या देष्ठातील 8.8 टक्के एवढी जनसंख्या ही आदिवासीयांची आहे. महाराष्ट्रातील ठाणे पासून ते मणिपुरच्या तेंग्नोपाल पर्यंत; केंद्रष्ठासित प्रदेष्ठांना मिळुन सर्व 26 राज्यांत पसरलेल्या आदिवासियांच्या संख्येने 100 मिलियन (10 करोड) चा आकडा पार केलेला आहे. हिंदू धर्मातील वर्ण व्यवस्थेत असलेले भेदाभेद, अन्याय-अत्याचार सहन करून गुलामा प्रमाणे जगण्यातुन वैतागल्यांनी मुस्लिम आणि ख्रिष्ठचन (ईसाई) धर्मांचा स्विकार केला. 1947 नंतर झालेल्या जनगणनेत उरलेल्या सर्वच जनतेला हिंदू मानण्यात आले आहे.

ब्रिटिशांच्या शासनकाळात झालेल्या जनगणनेत समस्त मूलनिवासियांचा धर्म हा प्राकतिक असण्याचे नमूद आहे. परंतु 1951 च्या नंतर मुद्दाम त्या पद्धतिला सोडून देण्यात आले. परिणामत: आदिवासी जनता स्वत:ला हिंदू समजुन त्याप्रमाणे धर्माला आत्मसात करण्यासारखी घातक परिस्थिति निर्माण झाली आहे. मूलनिवासींची ऐतिहासिक पाश्र्वभूमी, आपल्या अस्थित्वाची आकांक्षा, दुनियादारी आणि हिंदू धर्माच्या धोक्यापासुन सावध होण्याचे सोडुन अनेक जन स्वत:ला हिंदू समझण्याच्या भ्रमात अडकलेले आहेत. वास्तविकपणे ह्या देशातील कुठलाही मूलनिवासी हा हिंदू असुच शकत नाही हे ऐतिहासिक सत्य आहे. हिंदू धर्मातील वर्ण व्यवस्थेने आदिवासी आणि दलितांना पंचम दर्जा देऊन त्यांना आपल्यात विलय करून घेतला.

भौगोलीक दष्टीकोणातुन बघितल्यास पर्शियन लोक (पुर्वीचे इराण देशातील रहिवासी) आपल्या देशातील सिंधु नदी किंवा सिंधु सभ्यतेतील म्हणुन हिंदूस्थान (कारण त्यांच्याकडे 'स' चे उच्चारण 'ह' म्हणुन होते.) म्हणायचे. या मागे कुठलीही धार्मिक पष्ठभूमी नाही. तसेच आपल्याला 16 व्या शतकापर्यंत 'इंडिया' हा शब्द देखिल अनोळखी होता. भारत देशात मौर्यांच्या काळात बुद्ध धर्म, गुप्तांच्या काळात हिंदू धर्म मुस्लिम शासकांच्या काळात मुस्लिम धर्माचा प्रभाव राहिलेला आहे. आर्यांच्या प्रवेशा बरोबरच ब्राह्मणीय विचारधारांचा प्रभाव निर्माण झाला. आणि कालांतराने हा ब्राह्मण धर्मच हिंदू धर्मात परिवर्तित झाला. याबद्दल अधिक जाणण्यासाठी आपल्याला इतिहासाचे पाने पलटावे लागतील. आर्यांच्या अगोदरच्या काळात म्हणजे इसवी सन पूर्व 2500 (आज पासून जळपास 4500 हजार वर्षांपूर्वी) आपल्या देशात सिंधु सभ्यता उदयास आलेली होती. त्या काळात जगात असलेल्या अन्य सर्व सभ्यतेत सिंधु सभ्यता सर्वात विकसित अशी सभ्यता होती आणि तिथले रहिवासी हेच आपल्या देशातील मूलनिवासी आहेत, त्यांनाच द्रविड म्हणतात. मुळाने पशुपालन करणारे राक्षसी प्रवत्तीचे आर्यगण यांनी उच्च कोटिच्या सिंधु सभ्यतेला नष्ट केले आणि हे 1920 साली झालेल्या उत्खननातुन समजते. आर्य आणि द्रविड यांच्या दरम्यान झालेल्या लढाईत त्या काळापर्यंत 45 लक्ष एवढी मानवीय हानी झाल्याचे इतिहासकारांचे मत आहे आणि जी लढाई अद्यापर्यंत थांबलेली नाही. सध्या याचे विकत रूप म्हणजे धार्मिक हमले ज्याचे आदिवासी समुह प्रामुख्याने बळी बनत आहेत. देशातील मुस्लिम जनसंख्येतील 98 टक्के पेक्षाही अधिक हे दलित आणि आदिवासी आहेत. धार्मिक संघर्षाने देशाची नवी फाळणी केलेली आहे ज्याने मुंबई, गुजरात, कंधमाल, मुजफ्फरनगर, दिल्ली पर्यंत लाखो जनतेच प्राण घेतलेल आहे. देशातील एकुण लोकसंख्येच्या 15 टक्के हिंदू (ब्राह्मण 3.5 टक्के, क्षत्रिय 4 टक्के, वैश्य 5.5 टक्के तथा अन्य 2 टक्के) असतांनाही आपलीच बाजू घेऊन हिंदू धार्मिक कट्टरतावादी 'घर वापसी' नावाच्या आडाने देशात आतंकी हमले करीत आहेत. दूसऱ्या बाजूला धर्मांधतेला प्रोत्साहन देण्यासाठी तसा अभ्यासक्रम तैयार करीत आहेत. राजनीतिक, सांस्कतिक, सामाजिक क्षेत्रांत होणारे हमले देखिल वाढलेले आहेत ज्याचे बळी मुस्लिम, खिश्चनां सोबतच इथले मूलनिवासी देखिल बनत आहेत. ह्यावर योग्य पाऊल ऊचलल्या खेरिज मूलनिवासी स्वत:च्या अस्थित्वाला वाचवु शकणार नाही.

1957 मध्ये आंतरराष्ट्रीय श्रम संगठन जीनेवात संपन्न झालेल्या 107 व्या अधिवेशनात आपल्या देशातील आदिवासींना मूलनिवासी असल्याचे घोषित केले होते. परंतु त्याच्या 35 वर्षा नंतर यू.एन.ओ. ने (संयुक्त राष्ट्र संघ) आपला हा विचार बदलला. कारण कि 1994 साली जगातील सर्व मूलनिवासींच्या आंतराराष्ट्रीय दिन घोषणे समयी भारत सरकार द्वारा देशातील सर्व जनता ही मूलनिवासी असण्याचे बिनबुडाचे तर्क दिले होते. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 342 अनुसार राष्ट्रपती द्वारा मान्यता प्राप्त समुहांना देशात अनुसूचित जनजाती मध्ये मोडण्यात येते. आजपर्यंत भारत सरकार अनुसूचित जनजाती बाबत योग्य ती संकल्पना स्पष्ट करू शकली नाही. देशातील वोट बँकेची राजनीति करण्यासाठी अलग-अलग आदिवासींना अलग-अलग राज्यांत अनुसूचित जनजातीचा दर्जा दिला ज्यामुळे त्यांच्यात कुठल्याही प्रकारचे सांमजस्य निर्माण होत नाही. एका राज्यातील अनुसूचित जनजातीला दूसऱ्या राज्यात अस्वीकत होते. अशया प्रकारे देशातील सरकारचे अत्यंत बेजबाबदारीचे वर्तन असून संयुक्त राष्ट्र संघा समोर अनुसूचित जनजाती हे मुलनिवासी नसल्याचे सांगुन देशात आदिम काळापासुन राहणाऱ्या जनतेच्या अस्थित्वालाच नाकारले आहे. याचीच परिणती म्हणजे आदिवासींना आता वनवासी ही ओळख नवी ओळख मिळाली आहे. एकंदरीत हे सर्व हिंदू अधिपत्य शिवाय काही नाही. ज्याला परास्त केल्या शिवाय मूलनिवासी आपले अस्थित्व वाचवू शकणार नाही. यु.एनओ. द्वारा आदिवासींच्या हक्क आणि आत्मसम्मान सारख्या मुद्द्यांसाठी विश्व मूलनिवासी दिवस साजरा होत असतांना आणि 20 वर्षांपासून असलेली घोषणा असतांना मात्र देशातील आदिवासींचे जीवन धोक्यात आलेले आहे. देशातील आदिवासी जनता सामना करीत असलेल्या आव्हानां पैकी हे पहिले.

## 2. आदिवासी आणि संविधान

देशातील आदिवासी जनतेपुढे असलेल्या आव्हानातील हे दूसरे आहे. देशातील आदिवासी जनतेच्या कल्याण व विकासाठी असलेल्या भारतीय संविधानील कायद्यांची अंमलबजाणी केल्या जात नसल्याचे प्रत्येक राजनीतिक पक्ष एक-दुसऱ्यावर ओरडत असतात. देशात माओवादी आंदोलन तग धरू लागल्या नंतर राजनीतिक पक्षाचे केंद्र स्तरातील नेते मंडळी रोज काहीना काही विधान करीत असतात. आदिवासी जनतेचे अश्रु पुसण्याच्या नावाने आपले घुबड सरळ करण्याकडे त्यांचा जास्त कल असतो.

आपल्या देशातील संविधान लिहण्यासाठी तब्बल 2 वर्ष 11 महिने आणि 17 दिवस, एकंदरीत 1082 दिवसांच्या मेहनती नंतर

त्याला पुर्ण स्वरूप मिळाले. सुरवातीला यात 395 धारा, 8 अनुच्छेद होते जे वाढून 10 झाले. त्यामुळे हे संविधान जगातील सर्वांत मोठे लिखित संविधान आहे. यासाठी डॉ.बी.आर. आंबेडकर ह्यांच्या नेतृत्वात 385 लोकांनी (हिंदू 211, मुस्लिम 73, संस्थनिकातुन 93 तथा अन्य 4 हे सरकार द्वारा नियुक्त) कार्य केले होते.

- संविधानाच्या अनुच्छेद 17 अंतर्गत 1955 या सालात अस्पृश्यतेवर प्रतिबंध घालण्यात आला.
- संविधानाच्या अनुच्छेद 14 व 15 अंतर्गत समस्त मानव एक समान; या घोषणे अनुसार अस्पृश्यतेचे द्योतक व्यवस्थापन (हॉटेल, दुकान, विहीर, तलाव जिथे अस्पृश्यांना प्रवेश नाही) हटविण्याचे आदेश देण्यात आले.
- संविधानाच्या अनुच्छेद 16(4) आणि 335 द्वारा सार्वजनिक क्षेत्रात नौकरींमध्ये 22.5 आरक्षण देण्यात आले. (एस.सी./एस. टी. समुदायांसाठी)
- संविधानाच्या अनुच्छेद 330, 332, 334 च्या माध्यमातुन संविधान लागू झाल्याच्या 20 वर्षां पर्यंत आरक्षण अंमलात आणने आणि गरजे अनुसार त्याला वाढविण्याचे प्रावधान आहे. परिणामत: आजपर्यंत त्याची अंमलबजावणी चालु आहे.
- एस.सी., एस.टी. च्या विकासासाठी अुनच्छेद 164, 338 आहे.

वरील सर्व प्रावधानां शिवाय संविधानच्या पांचव्या आणि सहाव्या अनुसूचींची निर्मिती करण्यात आली. याखेरीज आजपर्यंत राज्य व केंद्र सरकारांनी अनेक कायदे बनविले आणि असे असतांना देखिल आदिवासींच्या जीवनात कुठलाही मुलभूत बदल आलेला नाही. उलट हे सर्व कायदे त्यांच्या उदरनिर्वाहालाच नियंत्रित करीत आहेत. उदाहरण सांगावयाचे झाल्यास 1927 सालातील ब्रिटिशांचा प्रतिक्रियावादी वन कायदा जो आजच्या सर्व कायद्यांची जननी आहे. हे सर्व कायदे जंगलावर निर्भर असलेल्या आदिवासी जनतेचे जीवन अस्ताव्यस्त करीत आहेत.

केंद्र सरकार द्वारा निर्मित 24 डिसेंबर 1996 सालातील पेसा कायदा, आदिवासींच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनलेला आहे. संविधानात 73 वे संशोधन करून पेसा म्हणजे आदिवासी भागात पंचायतीचा विस्तार हा नवा कायदा अस्थित्वात आला. या कायद्यासाठी योगदान देणारे स्वर्गीय श्री दिलीप सिंग भूरिया यांनी पेसाला 'आदिवासींच्या जीवनात एका नव्या युगाचे आगमन' म्हटले होते. परंतु शोकांतिका ही कि याचे कायद्यात रूपांतरण झाल्याचे दोन दशक लोटल्या नंतरही कुठल्याही एका राज्यात ह्या कायद्याची योग्य अंमलबजावणी झालेली नाही. यातुनच सरकारची आदिवासी जनतेबद्दल असलेली उदासिनतेचे दर्शन होते.

केंद्र सरकारकडुन सर्व राज्यांना पेसाच्या अनुसार पूर्ववत कायद्यांत बदल करण्याचे आदेश देण्यात आले. ज्यात राज्यांच्या राज्यपालांनी संपूर्ण जवाबदारीचे निर्वाहन करने, आदिवासी क्षेत्रातील ठोस मुद्दे, पेसाच्या अंमलबजावणीचे वार्षिक रीपोर्ट केंद्रला पाठवण्याबाबत हुकूम काढण्यात आला. असे असतांनाही पेसा लागू करण्याबाबत कुठल्याही राज्याने अनुकूलता दर्शविली नाही व सरकारी आदेशांना पाठ दाखवली. राज्यांचे राज्यपाल तर केंद्राद्वारा जारी केलेल्या अधिसुचनेंना कचऱ्याची टोपली दाखवित आहेत. त्वरीत सरकारी आदेशांना (जी.आर.) जारी करून पेसाच्या अंमलबजाणीत नव-नवे अवरोध निर्माण करीत आहेत. ह्या वर्षी महाराष्ट्रातील राज्यपालद्वारा जारी केलेले अनेक सरकारी आदेश याचेचं उदाहरण आहे.

गडचिरोली जिल्हात पेसाच्या अनुसार मालकी हक्क देण्यात मुद्दाम केलेल्या दिरंगाई मुळे शेकडो आदिवासी गावातील जनता बांबू कटाई आणि विक्री करू शकली नाही. ग्राम सभांना अधिकार करण्याबाबत जिल्हाधीशांचा देखिल अशयाच गैर वर्तणुकीमुळे पेसाची अंमलबजवणी होऊ शकलेली नाही. सरकारी अधिकाऱ्यांनी स्वत: ग्रामसभांना अधिकार करण्यासाठी जातीने लक्ष देण्याचे सोडून त्यात जटीलता निर्माण करण्याचे प्रयत्न चालवले आहेत ज्यामुळे जन विक्षोभाची परिस्थिती निर्मिती होत आहे. मागील दोन वर्षांत दुष्काळ आणि अतिवृष्टी सदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याने शेती आणि वनोत्पादनाची मोठ्या प्रमाणावर हानी झाल्याने जनतेवर उपासमारीची पाळी आलेली आहे. अशया या स्थितीत पेसाच्या अंमलबजाणीत होणाऱ्या दिरंगाईने जनतेच्या जखमेवर मीठ चोळले आहे. 2006 साली 'आदिवासी जिल्हे-पेसा-वाम चरमपंथ, सरकारी व्यवहार आणि आव्हाने' ह्या मुद्दयांवर केंद्राद्वारा नियुक्त अजय दांडेकर, चित्रांगदा चौधरी कमेटीने देशाच्या आदिवासी जिल्हांत माओवादी समस्या निर्माण झाल्याचा उल्लेख करून आपली रिपोर्ट सादर केली. तसेच दूसऱ्या बाजूला आदिवासी आणि गैर आदिवासी असा जनतेत कलह निर्माण करण्याच्या उद्देशाने स्वार्थी राजनीतिक शक्ति आरक्षणाचा मुद्दा पुढे आणत आहेत.

पेसा कायद्याबाबत जनतेला जागृत करण्याच्या बहाण्याने अनेक व्यक्ति व संस्था पुढे आलेले आहेत ज्यापासुन जनतेने सतर्क राहण्याची गरज आहे. असे लोक कायद्याचा सहारा घेऊन जनतेची दिशाभूल करतात. जनतेचे हित, जनतेच्या आकांक्षा व गरजांना पुढे करून कायद्याच्या अंमलबजावणीसाठी जनतेला नेतृत्व द्यावे ह्या विचारांपासून कायम दूर असणारे व्यक्ति किंवा संस्था जनतेच्या हितासाठी काहीही करू शकत नाही. ज्या कायद्याचे संविधानात कुठलाही उल्लेख नसतांना संविधानात संशोधन घडवुन आणून पेसा कायद्याच्या निर्मितीत जनतेचे योगदान जोपर्यंत समजणार नाहीत तो पर्यंत ते जनहिता बद्दल विचारही करू शकत नाही. आदिवासी

जनतेची जमीन, विशाल वनसंपदा अलग-अलग नावाने ताब्यात घेण्याचे सद्या प्रयत्न चालू आहेत. अनेक वर्षां पासून पर्यावरणाच्या कारणाने रखडलेल्या प्रकल्पांना नविन सरकाने पर्यावरणाचे नियम धाब्यावर बसवुन मंजूरी दिली आहे. एकंदरीत या सर्व हालचालींचे लक्ष्य पेसा कायद्याअंतर्गत निर्माण होणाऱ्या ग्रामसभांचे खच्चीकरण करने होय आणि ज्या विरोधात देशभरातील जनता रस्त्यावर उतरत आहे. सद्याच्या परिस्थितीत केंद्र सरकार द्वारा बनविलेल्या कायद्याने संपूर्ण मूलनिवासी जनतेच्या जीवनात अस्वस्थता निर्माण केलेली आहे. म्हणुन मूलनिवासींनी आपल्या हक्क आणि अस्मितेच्या बचावासाठी संघर्ष केल्याशिवाय ह्या आव्हानाचा सामना होऊच शकणार नाही.

# 3. आदिवासी-विस्थापणाचा मुद्दा

देशातील आदिवासी जनतेला सामना करावा लागणारे हे तीसऱ्या प्रकारचे आव्हान आहे. देशात चाललेल्या अनेक मोठ्या प्रकल्पांमुळे प्रत्येक आठ आदिवसींतुन मधील एक विस्थापित झालेला आहे. मागील 25 वर्षांपासून लागू असलेल्या उदारीकरण नीति (उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण) मुळे समस्या अधिक विकराल रूप धारण करीत आहे. जंगलांना नष्ट केल्या जात आहे. आदिवासींना उदरनिर्वाहासाठी स्थलांतरीत होण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. 1980 पासून प्रत्येक वर्षात 40 हजार (एक लाख एकर) जंगल आणि गैर वनीय (ज्याचा जंगल आणि तेथिल आदिवासीयांशी काहीही देणे-घेणे नसते) उपयोगासाठी खर्च केल्या जात आहे. 2008-11 च्या दरम्यान 1,82,389 हेक्टर वनजमीन (4,56,000) गैर वनीय प्रकल्पांसाठी खर्च केल्या गेला. ब्रिटिशांच्या काळात भूमी अधिग्रहण कायदा बनविण्यात आला ज्यात आदिवासींच्या जमीनी व जंगलांना आपल्या मनाप्रमाणे लूटण्यात अधिकार होते आणि आता तर विशाल वनसंपदा 'राष्ट्रीय विकास', 'राष्ट्रीय हीत' या गोंडस नावाखाली जड उद्यांच्या हवाली करण्याचे षड्यंत्रचं थाटले आहे. नैसर्गिक साधन संपत्तीवर होणारे अतिक्रमण ज्याला सरकार तथाकथित राष्ट्रीय विकास आणि हीत सांगत आहे ज्यात मूलनिवासींचा कुठलाही विकास अथवा हीत नसुन फक्त नुकसानच आहे. परिस्थितिचे गांभिर्य लक्षात घेण्यासाठी देशाचे माजी प्रधानमंत्री मनमोहन सिंग यांच्या विधानाकडे बघुया:

''आदिवासींच्या जीवनात अतिक्रमण केलेल्या वित्तीय प्रक्रिये तुन त्यांना बाहेर काढण्यात अपयश आले आहे.'' देशाच्या प्रधानमंत्र्याचे हे विधान आणि दहा वर्षां पूर्वी (2001 साली) राष्ट्रपती के.आर. नारायण यांनी म्हटले होते कि, ''आपल्याला आदिवासी आणि त्यांच्या प्रतिनिधींना विश्वासात घेऊन त्यांना देशातल्या प्रकल्पांबद्दल समजावुन त्यांच्या उदरणीर्वाह आणि संस्कृतिच्या संरक्षाबाबत चर्चा करणे ही आदिवासी भागात असणाऱ्या प्रकल्पांच्या यशाची प्राथमिक अट असणार.''

देशाच्या सर्वोच्च पदांवर आसनस्त नेत्यांकडुनच जर असल्या प्रतिक्रिया येत असणार तर आदिवासीयांनी कुणाकडे बघावे? आदिवासींनी आपली व्यथा कुणा पुढे मांडावी? देशाची परिस्थिती म्हणजे कुंपणानेच शेत खाल्ल्या सारखी झालेली आहे.

दुसरीकडे रोज नवं-नवे उद्योग, विशेष आर्थिक झोन्स आदिवासी क्षेत्रांवर दबाव टाकत आहे. याबाबत आपला गडचिरोली जिल्हा देखिल अपवाद नाही. सुर्जागड, दमकोडी, आगरी, मसेली, देवलमर्री इत्यादी सारख्या खनिज आणि खाणींच्या दोहणासाठी देशी-विदेशी कंपन्या मोठ्या प्रमाणावर भांडवलासह घुसखोरी करीत आहेत. राज्य सरकारां बरोबर अनेक करारांवर सह्या करून काम सुरू करण्याच्या तैयारीत आहेत. 'मेक इन इंडिया'च्या पाऊलावर पाऊल ठेऊन 'मेक इन महाराष्ट्र', 'मेक इन विदर्भ' आणि 'मेक इन गडचिरोली'च्या नाऱ्यांच गाजावाज करीत विदेशातील प्रत्यक्ष गुंतवणुकीला विपुल नैसर्गिक संसाधनांनी युक्त अशया जंगल, आदिवासींच्या कृषी भूमी व गांवाना लाल गालिचा पसरवून स्वागत करीत आहेत. परिणामत: जिल्हांतील हजारों परिवारांचे जीवन उध्वस्त होणार सोबतच पर्यावरणात प्रदूषणाची समस्या निर्माण होऊन त्याचा परिणाम मानवी जीवनांवर, पीकांवर, पशु-पक्षी, जनावरां बरोबर संपूर्ण जंगलांना प्रभावित करणार. भांडवलदारांच्या अमाप फायद्यासाठी मूलनिवासीयांचे आयुष्य बेचिराग होण्यापासून वाचविणे ही मूलनिवासींची तात्काळ जवाबदारी आहे.

देशाच्या हीत आणि विकासाच्या नावावर सरकारें मोठ्या गुंतवणूकीला निमंत्रण देत आहे तसेच अनेक वर्षां पासून बेरोजगार युवकांना रोजगाराचं गाजर दाखवित आहे. उद्योगांसाठी निर्माण करण्यात येत असलेल्या सर्व पायाभूत सुविधा (इन्फ्रास्ट्रक्चर) जनतेसाठी आहे सांगुन जनतेला मुर्ख बणवित आहे. घर व जमीनांच्या बदल्यात बाजार मूल्य पेक्षा जास्त भरपाई देने, पुनर्वसनाचे आश्वासन देत आहे. आपल्या अस्थित्वाला वाचविण्यासाठी मोठ्या आणि अवजड उद्योगांच्या विरोधात उभे राहल्यास बंदुकीच्या गोळ्यांनी त्यांना संपविण्यात येत आहे. सद्यस्थितीत भारतात 5 लाखांपेक्षा ही जास्त कारखाने आहेत. परंतु आदिवासीयांचे जीवन एका अत्योंदय कार्ड पर्यंत सीमित ठेवलेले आहे. आदिवासी जनतेच्या जीवनात सुधार घडवुन आणण्यासाठी देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी पंचशील सुत्रांचा मसुदा तयार केला होता, त्याने कुणाचा उद्धार झाला माहीत नाही? मोठी गुंतवणूक आणि आदिवासीयांचे जीवन; या एका म्यानात दोन तलवारी राहुच शकत नाही. मागच्या सरकारने केलेले सर्व करार आणि वित्तीय नितींना वर्तमान सरकार प्रामाणिकपणे आणि तीव्र गतीने लागू करीत आहे ज्याने आदिवासीयांचे जीवन अधिक धोक्याच्या उंबरठ्यावर येऊन ठेपली आहे. केंद्र सरकाने सद्या आणलेला भूमी अधिग्रहण कायदा अत्यंत विनाशकारी आहे. त्या सोबतच केंद्र सरकारने खनन

कायद्यात देखिल संशोधन केले आहे. ज्यातुन आदिवासीयांच्या विस्थापनाची समस्या अधिक तीव्र होणार हे तर नक्की! आपल्या जिल्हांतील जनता ह्याच्या विरोधात रस्त्यांवर ऊतरून विरोध करीत आहेत. आपल्या अस्थित्वाला वाचविण्यासाठी एकत्रित येऊन आपल्या आकांक्षाना दृढतेने जाहीर करीत आहेत.

विस्थापनाच्या समस्येसाठी दृढतेने मुकाबला करणाऱ्या बस्तर जनतेच्या अनुभवांना घेऊया. टाटा, एस्सार इत्यादी उद्योगांच्या स्थापनेसाठी केंद्र व राज्य सरकांच्या मदतीने आदिवासी मंत्री महेंद्र कर्माने सलवा जुडुम सुरू केले होते ज्या मार्फत आदिवासी समुहांत कलह निर्माण केला गेला. सरकारी आकड्यानुसार 644 गावातील जनता विस्थापित झाली. गावच्या गाव जाळयात आली, अनेक आदिवासी जनतेला निघृणतेने मारण्यात आले. शेवटी देशाच्या सर्वोच्च न्यायालयाला ह्यात हस्तक्षेप करावा लागला. सलवा जुडुमच्या पुर्वीही म्हणजे 1960 च्या दशकात बैलाडीला पहाडातुन लौह उत्पादानासाठी अनेक आदिवासी गावांना विस्थापित करण्यात आले. ज्या विरोधात ज्या कोणी आदिवासीने विरोध केला त्याच्यावर गोळ्या झाडण्यात आल्या. आताही तेथिल आदिवासी जनता संघर्षरत आहे. सर्व मूलनिवासीयांनी एकजुट होऊन संघर्ष केल्याशिवाय आपण या आव्हानाचा सामना करू शकणार नाही. विश्व मूलनिवासी आंतरराराष्ट्रीय दिनाच्या दशाब्दी निम्मिताने समस्त आदिवासी जनतेने आपले हक्क-अधिकार आणि अस्मिता वाचविण्याचा प्रयत्न करून विस्थापनाचा तीव्र विरोध करायचा आहे.

# 4. आदिवासी-संस्कृती

मूलनिवासी जनते पुढे असलेल्या आव्हाना पैकी हे चौथे आव्हान जे की आदिवासी जनतेच्या अस्थित्वाशी निगडित आहे. त्यांची उत्पादन प्रणाली समजुन घेतल्या शिवाय त्यांच्या संस्कृतीला समजु शकणार नाही. त्यांची विचार करण्याची पद्धती, चालीरीती, विधी, धर्म, देवी-देवता, लग्न समारोह, दाह-संस्कार, गोत्र यांचे महत्व, नातेसंबध, आपसी कलहांना सोडवण्याच्या पद्धती हे सर्व त्यांच्या संस्कृतीचा अविभाज्य अंग आहे. याबरोबरच आदिवासींच्या सामूहिक जीवनात राजनीतिक, विज्ञान आणि मनोरंजनाचे केंद्र गोटुल असुन त्याला फार महत्व आहे. ह्या सर्वांवर आधारीत अशी आदिवासी जीवनशैली व संस्कृती बहरत आहे. मूलनिवासीयांची उत्पादन पद्धती व संस्कृतींचा संगम त्यांना दूसऱ्या अन्य समुदायापासुन पृथक करते आणि हीच त्यांची विशेष ओळख ही निर्माण करते. आपल्या जिल्हाच्या सीमेवर असलेल्या माड या भागातील आदिवासी जनता आजही पेंदा शेती (प्रचलित प्राकृतिक शेती) करतांना आढळतात. आदिवासी जनतेला वनातुन मिळणारे वनउपज उत्पादित केलेल्या पीका समान आहे. त्यांच्या जीवनात कृषी उत्पादित पीकाला जेवढे महत्व आहे तितकेच महत्व वनोत्पादनाला आहे. मासे पकडने, पशु-पक्षींची शिकार करण्यासारख्या क्रियाकलापात आहार संग्रहणा बरोबरच त्यांचे मनोरंजन ही जुळलेले आहे. आदिवासी समाजा प्रती सरकारांची असलेल्या उदासिनता व निष्काळजीपणा मुळेच आपल्या शेतीची प्रगती झाली नाही. परिणामत: कट्टरता किंवा अंधविश्वासाने आदिवासी संस्कृती प्रभावित होऊन होणाऱ्या प्रगतीत अवरोध उत्पन्न झालेला आहे. आदिवासी समाजावर चहुबाजुने अपेक्षाकृत विकसित समाज आपल्या विचार, परंपरा, न्याय, रहनसहन, वेषभूषा यांना आदिवासी समाजावर लादत आहे. पूर्वीच्या भांडवली समाजातुन आलेल्या ब्रिटिशां पासुन आजचे शासक वर्ग आणि साम्राज्यवाद्यां द्वारा पाळलेले कथित स्वयंसेवी संघटना हेच उद्योग चालवित आहेत.

वर्तमान समाजात बुद्धिजीवी आणि आदिवासींचे हितैषी यांमध्ये दोन विचारधारा असणारे लोक आहेत. एक जे आदिवासी समाजाला बाह्य समाजा पासून दूर ठेऊन त्यांच्या संस्कृतीला यथावत वाचविण्याच्या पक्षाचे तर दूसरे ते जे आदिवासी समाजाच्या विकास प्रक्रियेला दुर्लक्षित करून आपल्या समाजात मिसळवण्याच्या पक्षाचे आहेत. असे दोन दृष्टीकोण असतांनाही आपल्यालाच आदिवासी समाजाचा विकासक्रम लक्षात घेऊन निर्णय करायचा आहे आणि याबाबत साजरा होणारा मूलनिवासी आंतरराष्ट्रीय दिवसाचा दशाब्दी सोहळ्या निमित्त जरूर मदत होणार. पेसा सारख्या कायद्यांची काही प्रमाणात मदत होणार पण शेवटी आपला विकासक्रम आपल्यालाच निर्धारीत करावा लागेल.

आपल्या संस्कृती विषयी विचार केल्यास महिलांचा देखिल विचार करावा लागेल. आपल्या आदिवासी समाजामध्ये पुरुषांपेक्षाही महिला ह्या दुप्पट श्रम करतात आणि ह्या सत्यला आदिवासी जीवनशैलीची जाणीव असणारेच समजु शकतील. मानवी इतिहास बघितल्यास हे लक्षात येते कि महिला या शेतीच्या विकासातील प्रेरक शक्ती होत्या. हस्त शिल्पाला ज्या प्रमाणे बघितल्या जाते त्याचप्रमाणे येथिल अर्धनग्न आदिवासी महिलांना बघितल्या जाते. त्यांची गरीबी, साधेपण आणि अज्ञानतेचा फायदा ऊचलुन त्यांना वेश्या व्यवसात ढकल्या जाण्याच्या घटना देखिल घडत आहेत. माल अर्थव्यवस्था काय यापासून अनभिज्ञ आदिवासींनाच आज माल समजले जात आहे. देशातील अनेक प्रमुख शहरांमध्ये चाललेल्या देह व्यापारात 'सेक्स वर्कर' म्हणुन जीवन जगत असलेल्या आणि आदिवासी समाजापासून तुटलेल्या महिलांचा नेमका आकडा किती सांगता येणार नाही. यातील अधिकांश महिलांचा तर पोलिस रिकॉर्ड ही नाही. महिलेंच्या लग्नाबाबत त्यांच्या स्वच्छेचा अधिकार ही हिरावून घेतला जात आहे. परंपरागत कन्या शुल्काच्या जागी आत हुंडा प्रथेने तोंड बाहेर काढले आहे.

शाळेत मुलांना शिकविण्यात येणाऱ्या पाठ्यक्रमात आदिवासीयांची जीवनशैली, संस्कृती, वैज्ञानिक शोधांना शिकविण्या ऐवजी

हिंदू धार्मिक विचारांना त्यांचा मनावर बिंबविल्या जात आहे. हिंदू देवतांच्या प्रार्थना केल्या शिवाय मुलांना शाळा व आश्रमशाळेत जेवण दिले जात नाही आणि ही परिस्थिती शासकीय आणि खाजगी या दोन्ही शिक्षण संस्थांमध्ये आहे.

21 व्या शतकात सुद्धा पुजारीच आदिवासीयांचे डॉक्टर आहे. जादु टोनाच्या नावाखाली होण्याऱ्या सामाजिक कोपात सर्वात जास्त बळी ह्या महिलाच बनतात. परंपरागत रक्त विवाह (मामा, आत्याची मुलगी किंवा मुलगा यांच्याशी होणारा विवाह) सिकलसेल सारख्या आजारांचे कारण बनत आहे. आपल्या देशात सद्यातरी यावर कुठलाही उपचार उपलब्ध नाही. आपल्या देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी मागच्या वर्षी जापान दौऱ्यावर असतांना ह्या बाबत मदत मागितली होती.

मूलनिवासींच्या कुठल्याही उत्सवात मग ते विवाह समारोह असो किंवा कुठलेही कर्मकांड पशुमांस (गाय, बैल, म्हशी इत्यादी) खाल्ल्या जाते. परंतु हिंदू धार्मिक अधिपत्य विचारधारेमुळे ही परंपरा नष्ट होत आहे. जिथे कुठे ही प्रथा अजून शिल्लक आहे तिथे देखिल 'गोहत्या प्रतिबंध' कायदे आणुन आदिवासीयांच्या खाण्या-पिण्याच्या परंपरागत सवयींवर जबदस्तीने प्रतिबंध लागू होतांना दिसत आहेत. महात्मा गांधीने म्हटले होत कि "गो मातेशी माझी जी श्रद्धा आणि भक्ती आहे ती मी कधीही सोडणार नाही." असे शिक्षण देऊन विद्यार्थींना मांसाहारा पासून दूर केल्या आहे. आदिवासी मुलांना प्रमाणित करणारे ओळखपत्र आणि प्रमाणपत्र (दुर्भाग्याने याला जाती प्रमाणपत्राच्या रूपाने सादर केल्या जाते) गैर आदिवासी देतात. असल्या दुष्परिणामयुक्त, दुष्ट परंपरेने भरलेल्या आणि अवैध असलेल्या कायद्यांना नकारून आदिवासी जनतेने आपल्या भविष्याचा स्वत: निर्माता बनने ग्राम सभेद्वाराच शक्य आहे. ह्यासाठी पेसाचा उपयोग करने मूलनिवासीयांचा अधिकार आहे. आपला आत्मसम्मान वाचविण्यासाठी हा कायदा संघर्षाचे माध्यम बनू शकतो. असे केल्यास मूलनिवासींचा आंतरराष्ट्रीय दशाब्दीत संयुक्त राष्ट्र संघ द्वारा नियुक्त EMRIP (Expert Mechanism on the Right of Indigenous People) चे लक्ष्य प्राप्तिच्या दिशेने आपले योगदान राहणार आणि त्यातुनच मूलनिवासींच्या पुढे असलेल्या आव्हानाचं निराकरण होणार.

## 5. मूलनिवासी जनता-शांती आणि सुरक्षा

मूलनिवासी जनते पुढे असलेल्या आव्हानांपैकी हे पाचवे आव्हान असुन खऱ्या अर्थाने सांगायचे झाल्यास वरील चारही समस्यांना शांती आणि सुरक्षा गंभीरपणे प्रभावित करीत असते. सद्याच्या समाज व्यवस्थेत ही समस्या सत्ता आणि कायद्याच्या अंतर्गत बघितल्या जाते. मात्र हे सर्व समजने सामान्य जनतेचे काम नाही ते समजणे सज्जनांचे काम आहे.

ब्रिटिश वसाहतवाद्यांच्या विरोधात पहिली गोळी, तीर चालविणारे हे आदिवासीच होते. इतिहासकारांचे म्हणने आहे कि जे ह्या सत्यला नाकारतात ते इतिहासाबरोबर न्याय करीत नाही. आदिमकाळा पासुन त्यांचे जीवन अस्थित्वाच्या संघर्षाशी जुळलेले आहे. आदिवासींचे मानने आहे कि पशु तुल्य माणसांबरोबर लढणे हे जनावरांशी होणाऱ्या संघर्षा पेक्षाही अधिक धोकादायक आहे. हिंसेला प्रोत्साहन देणारे अहिंसाचे सिद्धांत व प्रवचने देऊन त्यांच्या जीवन आणि विराचांरावर अंकुश लावण्याचा प्रयास करीत आहेत.

देशात असलेले आदिवासी क्षेत्र हे अमाप नैसर्गिक संसाधनांनी समद्ध आहे. परंतु हीच बाब मूलनिवासींच्या जीवावर उठलेली आहे. 1947 च्या पूर्वी ब्रिटिशांच्या बंदुकी बोलायच्या, अन्याय-अत्याचार आणि कठोर शिक्षा मिळायची. ब्रिटिशां नंतर आता जंगलात जिकडे-तिकडे भारतीय सैन्य व अर्द्धसैनिक बलच दिसतात. ज्याचे एकमात्र कारण म्हणजे तिथल्या भूगर्भात लपलेल्या अमाप साधन संपत्ती आहे. सत्तेला धर्माशी जोडून धार्मिक अधिपत्याचा विस्तार करण्याऱ्या इतिहासाची पुनरावृत्ती आता देशातील सशस्त्र बलांच्या साहाय्याने चालविल्या जात आहे. याचे उदाहरण ईशान्य भारत जिथे भारतीय सेना तेथिल आदिवासी जनतेवर अत्याचार करीत आहे.

वर्तमान काळात देशातील आदिवासी क्षेत्रात माओवादी समस्याच्या नावावर मोठ्या प्रमाणावर सशस्त्र बलांची तैनाती केली जात आहे. मागील 50 वर्षा पासुन जंगल क्षेत्रात माओवाद्यांच्या हालचाली वाढल्या आहेत हे तर सत्य आहे. आपल्या गडचिरोली जिल्हात देखिल ह्या हालचाली 1980 पासुन सुरू झाल्या. सोबतच ह्या सत्याला ही आपण नाकारू शकणार नाही कि त्यांची क्रांतिकारी जीवनपद्धती आणि त्यांच्या राजनीतिक व्यवहाराने स्थानीय जनता प्रभावित होऊन स्थानीय युवक-युवती क्रांतिकारी आंदोलनाचा भाग झाले आहेत. सरकार आणि पोलिसांचे याबाबत असे म्हणने आहे कि माओवादी आणि जनता यांमध्ये घनिष्ट संबध आहेत. अशया स्थितीत माओवादींच्या उच्चाटनाच्या नावावर जिथे-तिथे सुरक्षा बलांना तैनात करून परिस्थिती अजुन गंभीर बनलेली आहे. ज्याप्रमाणे पाण्यातुन मासळी पकडल्या जाते त्याचप्रमाणे सुरक्षा बल माओवाद्यांना पकडण्यासाठी गांवाची घेराबंदी करने, गांवाना खाली करने, संशयास्पद व्यक्तिंना अटक करने, महिलांशी अभद्र व्यवहार करने (काही दिवसांपूर्वी उडेरा गावातील मैनी पुंगाटी या महिले बरोबर सी-60 कमांडोंनी केलेला दुरव्यवहार), अन्याय विरोधात बोलणाऱ्यांची पिटाई करणे हे सर्व जणु आज एक साधारण बाब बनलेली आहे. असल्या प्रकारचे अत्याचार चालविण्यासाठी इथे कार्यरत एका-एका सी-60 कमांडोवर (ज्यात मोठ्या प्रमाणावर आदिवासी युवकांची भरती केलेली आहे) वर्षाला 75 लाख रुपयांचा खर्च केल्या जातो. ज्यामुळे आदिवासींच्या आपापसात अनाशयक भेगा

पडल्या आहे.

सरकार खोट्या आरोपाखाली गावातील सामान्य जनतेला कारागृहात पाठवित आहे ज्यातुन शांती आणि सुरक्षेचा प्रश्न अधिक संवेदनशील बनलेला आहे. दशकानंतरही आजही टाडा पीडित कोर्टाचे चक्कर मारीत आहेत. आज पर्यंत देशातील 53 हजार लोकांना टाडा अंतर्गत अटक करण्यात आली ज्यातील मात्र 434 लोकांना न्यायालयाने दोषी ठरविले. यातुन हे स्पष्ट होते कि हे सर्व कायदे आदिवासींना प्रत्यक्षात किती प्रताडित करतात. टाडा नंतर आलेल्या पोटा आणि यु.ए.पी.ए. ने तर जनतेचा छळ करण्यात टाडालाही मागे सोडले आहे. टाडाचे अनुभव गडचिरोलीच्या कुठल्याही दुर्गम भागातील जनतेला विचारणा केल्यास ते आपली व्यथा मांडणार. जनतेत पसरलेली अशांती आणि असुरक्षेची भावना त्यांच्याशी एकरूप असणारे व्यक्तिच समजु शकतील.

जंगलात वास्तव्य करणारे आदिवासी आपल्या आत्मरक्षणासाठी तसेच जनावरांच्या शिकारीसाठी परंपरागत शस्त्र घेऊन फिरणे यात कुठलेही आश्चर्य नाही ज्यात गोपनीयता आणि उघडपणा दोघांचाही समावेश आहे. गोपनीयता म्हणजे त्यांच्याकडे शस्त्राचे परवाने (लायसन्स) नाहीत आणि उघडणा यासाठी कि त्यांच्याकडे शस्त्र आहेत ही बाब सर्वांना माहित आहे. ह्याची माहिती माओवाद्यांचे उच्चाटन करण्यासाठी आलेल्या सशस्त्र बलांना असतांना देखिल जंगल तलाशी अभियानात दौरान आदिवासी आपल्या परंपरागत शस्त्रासह सामोर आल्यास कुठलाही संकोच न करता गोळ्या झाडतात. भामरागड तहसीलातील मरकानार गावातील चिन्ना मट्टामी यांवर असेच पोलिसांनी गोळ्या झाडून मारले ज्याला महाराष्ट्र उच्च न्यायालयाने अपराध घोषित केले. असे असतांनाही जून 2014 मध्ये एटापल्ली तालुक्यातील विकासपल्ली गावातील बिजू कोला ह्यांची महाराष्ट्रातील सी-60 कमाण्डो द्वारा निघृण हत्या करण्यात आली. या घटनांच्या व्यतिरिक्त मागील 35 वर्षांपासुन अनेक युवकांची हत्या झालेली आहे. याच्या उलट खोट्या आरोपांखाली ज्यांनाही पकडुन नेण्यात येते न्यायालया द्वारा त्यांना कठीन कारावासाची सजा दिल्या जाते. ज्यामुळे मूलनिवासींच्या मनात कमालीची असुरक्षेची भावना निर्माण झालेली आहे. प्रत्यक्षात दोषींना सजा देण्याचा अधिकार ग्रामसभे जवळ असल्यास निरपराध लोकांना अनावश्यक त्रास सहन करावा लागणार नाही. त्यासाठी तात्काळ सर्व आदिवासी गावात ग्राम सभांची निर्मीती करायची आहे आणि असे करूनच आपण मूलनिवासीयांचा आंतरराष्ट्रीय दिवस व दशाब्दीला अभिप्रेत आदिवासींचे हक्क-अधिकार, आत्मसम्मान, निडर जीवन, आत्मनिर्भरता आणि स्वातंत्रतेची हमी मिळवु शकणार.

**ग्राम सभा निर्माण समिति**

**जिल्हा गडचिरोली-महाराष्ट्र**






अंदमानातील (भारत) जारवा आदिवासी.
कदाचित सरकारी भाषेत यालाच विकास म्हणतात?




पापुआ गीनीतील आदिवासींवर (इंडोनेशिया) सेनेद्वारा अत्याचार करून खाणीसाठी त्यांना विस्थापि केल्या जात आहे.




पेरू देशातील (दक्षिणअमेरीका) एक आदिवासी जमात, त्यांची झोपडी व हत्यार